जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/११/२०२४
## दि.१५/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३८०/२०२४, भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) |
| **फिर्यादी** | मधु सरसंभी,वय २९ वर्षे,रा.धानोरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/११/२०२४ रोजी रात्रौ २३/०० ते दिनांक १५/११/२०२४ रोजी सकाळी ०७/०० वा. दरम्यान राहते घरी स नं ६७ फ्लॅट नं २०३, तेज रेसीडेन्सी,अे विंग, धानोरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप व कडी कोयडा कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे व चांदीचे दागिने असा एकुण ३,५१,००० /- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.नितीन राठोड,मो.नं.९९२२७४४५९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४८८/२०२४, भा.न्या.सं.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३५ वर्षे रा.जुनी सांगवी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/११/२०२४ रोजी सकाळी ०८/०० वा.चे सुमारास पंढरपुर ते दुपारी ०२/३० वा. स्वारगेट एस.टी.स्टँन्ड येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या वर नमुद केले तारीख वेळी पंढरपुर येथुन पुणे येथे एस.टी.बस ने प्रवास करत असतांना फिर्यादी हया स्वारगेट जवळ आल्यानंतर त्यांनी त्यांची पर्स चेक केली असता पर्सची चैन उघडी दिसल्याने फिर्यादी यांनी पर्स चेक केली असता पर्स मध्ये ठेवलेले १,२०,०००/- किंमतीचे सोन्याचे दागिने मिळुन आले नाही.ते कोणीतरी अज्ञात इसमाने प्रवास दरम्यान चोरून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राहुल कोलंबीकर,मो.नं.९४०४९०११११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७५५/२०२४, भा.न्या.सं.कलम १३२,३५२,३५१(२),३(५) |
| **फिर्यादी** | गणपत पवार,वय ५६ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/२०२४ रोजी दुपारी १५/४५ ते सायंकाळी १८/३० वा पर्यत हवेली क्रं.०३, निबंधक कार्यालय, मेगा सेंटर,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे निबंधक कार्यालय येथे नोकरीस असुन वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन धमकी दिली तसेच त्यांना धक्का मारला व ते करीत असलेल्या शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा दाखल |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.चव्हाण मो.नं.९०११३२८०९० |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे १२६६/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१६(५),३१९(२),३१८(४),३(५)आय टी ॲक्ट ६६(डी)

**फिर्यादी** एक इसम वय ६३ वर्ष रा.उंड्री पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०५/१०/२०२४ ते दिनांक २१/१०/२०२४ फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील नमुद मोबाईल धारक यांनी शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यावर चांगला परतावा मिळतो अशी जाहीरातीच्या अनुषंगाने लिंक पाठवुन अँप्लीकेशन डाऊनलोड करण्यास लावुन सदर अँप्लीकेशनच्या माध्यमातुन शेअर मार्केट करीता त्यांचे वेगवेगळ्या बँक अकाऊंट मध्ये एकुण ३६,५२,०००/-रु अशी रक्कम प्राप्त करुन सदर शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केलेल्या पैशाबाबत काही एक परतावा व मुळ रक्कम परत न देता आर्थिक ऑनलाईन फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.नि.(गुन्हे)श्री.शेख मो.नं.९८७०३८०८६९

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे २८०/२०२४, भा.न्या.सं.कलम २२१,३३६(३),३३८,३४०(२),३५१(१),३(५)

**फिर्यादी** प्रसाद डोंगरे,सहा पोलीस निरीक्षक,नेमणुक डेक्कन वाहतूक शाखा पुणे शहर

**आरोपीत** पती व पत्नी (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि १४/११/२०२४ रोजी १६/०० वा. चे सुमारास डेक्कन वाहतूक विभाग कायार्लयाचे आवारात व विभागाच्या समोरील सावर्जनिक रोडवर शिवाजी नगर पुणे.

**तपशिल** वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद इसम व त्याची पत्नी यांनी त्यांचे दोन दुचाकी या टोईंग करुन वाहतुक विभाग येथे कार्यवाही करणे कामी आणल्याचा राग मनात धरुन व प्रलंबित दंड पेड न करण्याचे उद्देशाने डेक्कन वाहतूक विभाग कार्यालयाचे आवारात व विभागाच्या समोरील सार्वजनिक रोडवर गोंधळ घालून वाहतूक अडवुन ठेवली. व वाहतूक पोलीस समजावण्यास गेले असता फिर्यादी व पोलीस अंमलदार यांना वाईट बोलुन नोकरी घालवण्याची धमकी दिली. व सरकारी कर्तव्य करण्यास अटकाव केला.तसेच नमुद इसम यांनी त्यांचे दुचाकीवर जाणीवपुर्वक बँकेची,तसेच पोलीस कारवाई टाळण्यासाठी बनावट वाहन क्रमांक लावुन, त्याचा वापर करुन बनावटीकरण करुन शासनाची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.कविराज पाटील मो.नं.८३६९७३६५०३

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे ६०८/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१८(४),३९९(२),३१६(५),६१(२),३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी)

**फिर्यादी** एक इसम वय ३७ वर्ष रा.खराडी पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २०/०७/२०२४ रोजी ते दिनांक २४/०९/२०२४ रोजी दरम्यान राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना यातील नमुद मोबाईल धारक इसमांनी विश्वास संपादन करुन ट्रेडींगमध्ये गुंतवणुक करुन त्यामधुन चांगला परतावा मिळेल असे आमिष दाखवुन ३४,३८,८२७/- रूपये इतक्या रकमेची आर्थिक फसवणुक केली म्हणून गुन्हा

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी.चव्हाण,मो.नं.९४२२६१५५७५

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे १२६८/२०२४, भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४)आय टी ॲक्ट ६६(डी)

**फिर्यादी** एक इसम वय ५२ वर्ष रा.कोंढवा रोड, पुणे

**आरोपीत** मोबाईल धारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०३/०९/२०२४ ते दिनांक २३/०९/२०२४ रोजी फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना व्हाटसअप गृप मध्ये अँड करुन व्हॉटसअँप द्वारे संपर्क करुन फिर्यादी यांना शेअर स्टॉक/आयपीओ खरेदी करण्याकरीता भाग पाडून फिर्यादी यांना लिंक पाठवून अँप डाऊनलोड करुन घेवून त्यावर भरघोस नफा मिळत असल्याचे

| | |
|---|---|
| | भासवून फिर्यादी यांना विविध बँक अकाउंटवर पैसे भरण्यास सांगून भरलेल्या रक्कमे पैकी काहीएक रक्कम परत न करता फिर्यादी यांची एकूण १६,२५,०००/- रु ची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.नि.(गुन्हे)श्री.शेख मो.नं.९८७०३८०८६९ |

**<u>दि.१६/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दुपारी १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे १३९/२०२४ भा.न्या.सं.कलम २८१,१०६(१),३२४(४),मो.व्हि.ॲक्ट कलम ११९/१७७,१८४,१३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय २३ वर्षे रा.मु.पो.खडकवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/११/२०२४ रोजी २३/१० वा.चे सुमा धमवन बंगला समोरील कुडजे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची फिर्यादी की, वर नमुद ता वेळी व ठिकाणाहुन फिर्यादी यांचे वडील नामे विठ्ठल गणपत ढमढेरे,वय ५३ वर्ष रा.मु.पो.खडकवाडी ता.हवेली जि.पुणे, हे मोटर सायकल वरुन घरी येत असताना सदर नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पीकअप गाडी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस समोरून जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.संतोष कदम मो.नं ९८२१६२४६६५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**